सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२

# मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२

(दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. XLII of 1953

# The Bombay Personal Inams Abolition Act, 1952

*(As modified upto 13th November, 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामुग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

2007

(किंमत : रु. ३-००)

# सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४२

## मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२

अनुक्रमणिका

उद्देशिका


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. ... ... ... | ३ |
| २. | व्याख्या. | ३ |
| ३. | अधिनियम विवक्षित इनामांना व अनुदानांना लागू नसणे. ... ... ... | ४ |
| ४. | जात इनामे व इनामांच्या संबंधातील हक्क नाहीसे करणे. ... ... ... | ४ |
| ५. | इनाम गाव किंवा इनाम जमीन यांची जमीन महसूल देण्याबाबतची पात्रता व इनामदार व कायम धारक हा, खातेदार असणे. ... ... ... | ५ |
| ६. | रोकड भत्ता रद्द केल्याबद्दल नुकसानभरपाई. ... ... ... | ५ |
| ७. | इनाम गावात असलेले सर्व सार्वजनिक रस्ते, वगैरे शासनाकडे निहित होणे.... ... | ५ |
| ८. | झाडासंबंधीचे हक्क. ... ... ... | ६ |
| ९. | खाणी व खनिज पदार्थ यांवरील हक्क. | ६ |
| १०. | कलम ७ अन्वये हक्क नाहीसा झाल्याबद्दल इनामदारांना नुकसानभरपाई ... ... | ६ |
| ११. | जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुध्द अपील. ... ... ... | ७ |
| १२. | महसूल न्यायाधिकरणासमोर काम चालविण्याची कार्यपध्दती. ... ... | ७ |
| १३. | मुदत. ... ... ... | ७ |
| १४. | न्यायालय फी. ... ... ... | ७ |
| १५. | निवाड्यांचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयाचे निर्णायकत्व.... ... ... | ७ |
| १६. | चौकशी व कामकाज हे न्यायसंबंधी कामे असणे. ... ... ... | ८ |
| १६क. | विवक्षित हक्क नष्ट केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत. ... ... | ८ |
| १७. | मालमत्तेतील इतर हक्क नाहीसे करणे, वगैरेबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत. ... | ८ |
| १७क. | हस्तांतरित कर्ज रोख्याच्या स्वरुपात नुकसानभरपाईची रक्कम देण्याजोगी असणे. ... | ९ |
| १८. | सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७ च्या तरतुदी इनामदार व कूळ यांच्या संबंधास लागू असणे. | ९ |
| १९. | नियम. ... ... ... | ९ |
| २०. | विवक्षित अधिनियमात फेरफार करणे व ते लागू असण्याचे बंद होणे. ... ... | ९ |
| | अनुसूची-एक ... ... ... | १० |
| | अनुसूची-दोन ... ... ... | १० |

# सन १९५३ च्या मुंबई अधिनियम ४२[1]

## [मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२]

[२० जून, १९५३]

या अधिनियमात पुढील अधिनियमांअन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९५४ चा मुंबई अधिनियम ९.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम ४०.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ४३.

**मुंबई राज्यातील जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सार्वजनिक हिताच्या दृष्टीने मुंबई राज्यातील जात इनामे नाहीशी करणे आवश्यक व इष्ट आहे; **त्याअर्थी,** या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई जात इनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, विलीन केलेला प्रदेश वगळून, [2][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रास] लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबत जो दिनांक निर्दिष्ट करील त्या दिनांकास अंमलात येईल.

**२.** (१) विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात,-- व्याख्या.

(क) "नेमलेला दिनांक" याचा अर्थ, ज्या दिनांकास हा अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, असा आहे ;

१८७९ चा मुंबई ५. (ख) "जमीन महसूल अधिनियम" याचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, असा आहे ;

[3][(खक) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कामे पार पाडण्यासाठी व त्याचे अधिकार चालविण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;]

(ग) "इनामदार" याचा अर्थ, जात इनाम धारण करणारी व्यक्ती, असा आहे व तीत त्याच्या वतीने किंवा त्याच्या मार्फत वैधरीत्या इनाम धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(घ) "इनाम गाव" किंवा "इनाम जमीन" याचा अर्थ, जात इनाम म्हणून एखाद्या व्यक्तीने धारण केलेले, यथास्थिति, गाव किंवा गावाचा भाग किंवा जमीन, असा आहे ;

(ङ) "जात इनाम" याचा अर्थ,--

(एक) जमीन महसूल अधिनियम, याच्या कलम ५३ अन्वये ठेवलेल्या दुमाला जमिनीच्या नोंदवहीत जात इनाम म्हणून दाखल केलेले, अनुदान दिलेले गाव, गावाच्या भाग, [4][जमीन (गावाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या किंवा जमिनीच्या उत्पन्नातील कोणताही हिस्सा धरून) किंवा] जमीन महसूल देण्याची पूर्णत: किंवा अंशत: माफी, असा आहे ;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, १९५२, भाग ५, पृष्ठ ४० पहा.

[2] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आणि तो नेहमी करिता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(दोन) निवृत्तिवेतन अधिनियम, १८७१ या अन्वये केलेल्या नियमांनुसार ठेवलेल्या दप्तरात वर्ग १, २, ३, ४ किंवा ५ यात दाखल केलेली रोकड भत्ता म्हणून द्यावयाची कोणतीही बाब धरून कोणताही हक्क, विशेष हक्क, अवांतर प्राप्ति किंवा पद यांच्या संबंधात राज्य शासनाने द्यावयाचे पैशाचे किंवा जमीन महसुलाचे अनुदान, असा आहे. १८७१ चा २३.

**स्पष्टीकरण.**--कोणतेही अनुदान हे, जात इनाम आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याचा निर्देश राज्य शासनाकडे केला पाहिजे व राज्य शासनाचा निर्णय अंतिम असला पाहिजे ; [१][आणि अधिनियमाच्या कलम ५३ अन्वये ठेवलेल्या दुमाला जमिनीच्या नोंदणी पुस्तकात अशा देणगीच्या संबंधात कोणतीही नोंद असल्यास ती त्याप्रमाणे सुधारण्यात आली आहे असे समजले पाहिजे.]

(च) "विहित केलेले" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा आहे ;

(छ) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(२) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या इतर शब्दांचे व शब्दप्रयोगांचे जमीन महसूल अधिनियमात त्यांना जे अर्थ असतील, तेच अर्थ असतील.

अधिनियम विवक्षित इनामांना व अनुदानांना लागू नसणे.

**३.** या अधिनियमातील कोणताही मजकूर,--

(१) सरंजामे जहागिऱ्या व इतर राजकीय इनामे ;

(२) देवस्थान इनामे किंवा धार्मिक किंवा धर्मार्थ संस्थांनी धारण केलेली इनामे ;

(३) सरकारोपयोगी सेवेबद्दल धारण केलेली इनामे ;

(४) समाजोपयोगी सेवेबद्दल धारण केलेली इनामे ; व

(५) ज्यांच्या पासून कोणताही फायदा मिळविण्याचा हेतू नसेल अशा शाळा, महाविद्यालये, इस्पितळे, दवाखाने, धार्मिक किंवा धर्मार्थ संस्था किंवा इतर सार्वजनिक कामासाठी शासनाने दिलेल्या महसुलाची माफी असलेल्या जागा, यांना लागू असणार नाही.

[२][**स्पष्टीकरण** :--या कलमाच्या कारणाकरिता धार्मिक किंवा धर्मादाय संस्थांनी धारण केलेली इनामे म्हणजे धार्मिक किंवा धर्मादाय संस्थेसाठी त्या वेळच्या शासनाधिकाऱ्याने दिलेली किंवा मान्यता दिलेली आणि अधिनियमाच्या कलम ५३ अन्वये ठेवलेल्या दुमाला जमिनीच्या नोंदणीपुस्तकात किंवा सन १८७१ चा निवृत्तिवेतन अधिनियम या अन्वये केलेल्या नियमांनुसार ठेवलेल्या कागदपत्रात तशी इनामे म्हणून दाखल केलेली देवस्थाने किंवा धर्मादाय इनामे होत.] १८७१ चा २३.

जात इनामे व इनामांच्या संबंधातील हक्क नाहीसे करणे.

**४.** कोणतीही वहिवाट, कबुलायत, अनुदान, सनद किंवा आदेश किंवा न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही विधि यात कोणताही मजकूर अंतर्भूत असला तरीही, नेमलेल्या दिनांकापासून व त्या दिनांकास,

(एक) सर्व जात इनामे ही, नाहीशी करण्यात आली आहेत असे समजण्यात आले पाहिजे ;

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये स्पष्टपणे जी कोणतीही तरतूद केलेली असेल ती खेरीजकरून, तशा जात इनामांच्या संबंधात उक्त दिनांकास वैधरित्या अस्तित्वात असलेले सर्व हक्क हे, नाहीसे करण्यात आले आहेत असे समजण्यात आले पाहिजे :

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०, कलम ४, दुसरी अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम ४, दुसरी अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, फक्त जमीन महसुलीची पूर्णत: किंवा अंशत: माफी असलेल्या जात इनामांच्या बाबतीत, अशी माफी--

(क) अशा माफीची रक्कम रु. ५,००० किंवा त्याहून जास्त असेल तर, दिनांक १ ऑगस्ट, १९५३ पासून; व

(ख) इतर सर्व बाबतीत दिनांक १ ऑगस्ट, १९५५ पासून नाहीशी करण्यात आली आहे असे समजण्यात आले पाहिजे.

इनाम गाव किंवा इनाम जमीन यांची जमीन महसूल देण्याबाबतची पात्रता व इनामदार व कायम धारक हा खातेदार असणे.

**५.** (१) सर्व इनाम गावे किंवा इनाम जमिनी जमीन महसूल अधिनियमाच्या व त्या अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदीनुसार जमीन महसूल देण्यास पात्र आहेत व असतील व बिनदुमाला जमिनीसंबंधीचे जमीन महसूल अधिनियमाच्या व नियमाच्या तरतुदी ह्या, अशा जमिनींना लागू असतील.

(२) (क) इनामदार म्हणून त्याच्या प्रत्यक्ष कब्ज्यात असलेल्या किंवा खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला कनिष्ठ धारकाव्यतिरिक्त त्याच्यामार्फत धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्ज्यात असलेल्या इनाम जमिनीच्या संबंधात इनामदार हा, किंवा

(ख) फक्त वार्षिक आकारणी देऊन इनाम जमीन धारण करणारा कनिष्ठ धारक हा, त्याने धारण केलेल्या अशा जमिनीच्या संबंधात राज्य शासनास देण्याजोगा जमीन महसूल भरण्यास प्रथमत: जबाबदार असला पाहिजे व जमीन महसूल अधिनियम किंवा त्या अन्वये केलेल्या नियमांनी किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणताही विधि या अन्वये खातेदार या नात्याने अशा जमिनीच्या संबंधातील सर्व हक्क मिळण्याचा त्यास हक्क असेल व तो सर्व बंधनांना जबाबदार असला पाहिजे.

रोकड भत्ता रद्द केल्याबद्दल नुकसान-भरपाई.

**६.** कोणताही विधि, वहिवाट, कबुलायत, अनुदान, सनद किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, [१][कलम २ (१) (ङ) (एक) मध्ये उल्लेख केलेल्या गावाच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या किंवा जमिनीच्या उत्पन्नातील कोणत्याही हिश्श्याची रक्कम, किंवा यथास्थिति,] जात इनाम म्हणून एखाद्या इनामदारास येणे असलेली कलम २ (१) (ङ) (दोन) मध्ये उल्लेखिलेली रोकड भत्ता रकमेच्या कोणतीही असल्यास, सातपटीइतकी रक्कम, [२][असा हिस्सा किंवा अशी नेमणूक] मिळण्याचा त्याचा हक्क नाहीसा झाल्याचे विचारात घेऊन, नुकसानभरपाई दाखल त्यास दिली पाहिजे.

इनाम गावात असलेले सर्व सार्वजनिक रस्ते वगैरे शासनाकडे निहित होणे.

**७.** कोणत्याही इनाम गावाच्या किंवा इनाम जमिनीच्या हद्दीत असलेले सर्व सार्वजनिक रस्ते, गल्ल्या व वाटा व त्यावरील किंवा त्याजवळील सर्व पूल, चर, धरणे व कुंपणे व भरतीच्या पाण्याच्या निशाणीखालील समुद्राचा, बंदरांचा व खाड्यांच्या तळ व नद्यांचा, ओढ्यांचा, नाल्यांचा, सरोवरांचा, विहिरींचा व तळ्यांचा तळ व सर्व कालवे व पाण्याचे पाट व सर्व साचलेले व वाहते पाणी व गावाच्या बाजूस असलेली घरे न बांधलेल्या सर्व जमिनी, सर्व पडीत व सर्व लागवडीखाली न आणलेल्या जमिनी (इमारतींसाठी किंवा इतर कोणत्याही बिनशेतीविषयक प्रयोजनांसाठी उपयोगात आणलेल्या जमिनी खेरीजकरून) ही, त्यात किंवा त्यावर इनामदाराव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे जे कोणतेही हक्क प्रस्थापित करण्यात येतील ते खेरीजकरून व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधित इतर जी कोणत्याही रीतीने तरतूद केली असेल ती खेरीजकरून, त्यातील त्याज जवळील किंवा त्यांच्या संबंधातील सर्व हक्कसुद्धा, राज्य शासनाची मालमत्ता असेल व आहे असे समजण्यात आले पाहिजे व अशा मालमत्तेतील इनामदाराने धारण केलेले सर्व हक्क हे नाहीसे झाले आहेत असे समजले पाहिजे व जिल्हाधिकाऱ्याने, राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, लोकांचे किंवा व्यक्तींचे वैध रीतीने अस्तित्वात असलेले जाण्यायेण्याचे हक्क व इतर हक्क यांस नेहमी अधीन राहून, त्यांची विल्हेवाट लावणे हे विधिसंमत असेल.

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ३(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता कोणतीही जमीन, जर ती नेमलेल्या दिनांकाच्या निकटपूर्वी लागोपाठ तीन वर्षाच्या मुदतीपर्यंत लागवडीखाली आणलेली नसेल तर, ती लागवडीखाली न आणलेली जमीन म्हणून समजण्यात आले पाहिजे.

झाडा-संबंधीचे हक्क.

८. भारतीय जंगल अधिनियम, १९२७ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधि या अन्वये खास रीतीने राखून ठेवलेल्या झाडांसंबंधीचा हक्क, राज्य शासनाकडे निहित होईल. अशा झाडात, कोणताही करार, अनुदान किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला विधि या अन्वये ज्या झाडासंबंधीचा मालकी हक्क शासनाने हस्तांतरित केला असेल त्या झाडाचा समावेश होत नाही व या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे [1][महाराष्ट्र राज्यातील मुंबई क्षेत्रात] अंमलात असलेला भारतीय जंगल अधिनियम, १९२७, च्या तरतुदी, इनाम गावातील किंवा इनाम जमिनीतील जंगलास लागू करण्याच्या राज्य शासनाच्या हक्कास कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही. १९२७ चा १६.

खाणी व खनिज पदार्थ यांवरील हक्क.

९. हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही विधि यातील कोणत्याही मजकुरामुळे, नेमलेल्या दिनांकास, त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही करार, अनुदान किंवा विधि या अन्वये किंवा न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये इनामदारास दिलेल्या किंवा मान्य केलेल्या इनाम गावातील किंवा इनाम जमिनीतील खाणी किंवा खनिज पदार्थ यांजवरील हक्कास बाध येते असे समजण्यात येता कामा नये.

कलम ७ अन्वये हक्क नाहीसा झाल्याबद्दल इनामदारांना नुकसान-भरपाई.

१०. (१) कलम ७ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही मालमत्तेतील कोणतेही हक्क किंवा हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही इनामदारास पुढील परिच्छेदात तरतूद केलेल्या रीतीने नुकसानभरपाई मिळण्याचा हक्क असला पाहिजे :--

(क) नेमलेल्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत, इनामदाराने जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज केला पाहिजे व त्यात, त्याच्या हक्काचे किंवा हितसंबंधाचे स्वरुप, त्याचा दावा ज्यावर आधारलेला असेल ते मुद्दे व त्याचे हक्क किंवा हितसंबंध नाहीसे झाल्याबद्दल त्याने मागणी केलेली नुकसानभरपाईची रक्कम ही नमूद केली पाहिजे ;

(ख) जिल्हाधिकाऱ्याने जमीन महसूल अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केली पाहिजे व मालमत्तेतील अर्जदाराचा कोणताही हक्क किंवा हितसंबंध होता व असा हक्क किंवा हितसंबंध कलम ७ अन्वये नाहीसा करण्यात आला आहे अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल तर, त्याने भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम ११ यात विहित केलेल्या रीतीने पुढील शर्तीस अधीन राहून, निवडा दिला पाहिजे :- १८९४ चा १.

(एक) जर संबंधित मालमत्ता ही, पडीत किंवा लागवडीखाली न आणलेली परंतु लागवडीखाली आणण्यास योग्य अशी जमीन असेल तर, नुकसानभरपाईची रक्कम जमिनीच्या आकारणीच्या रकमेच्या तिप्पटीपेक्षा अधिक असता कामा नये :

परंतु, जर त्या जमिनीवर आकार बसविलेला नसेल तर, अशी नुकसानभरपाईची रक्कम ही, त्याच प्रयोजनाकरिता उपयोगात आणलेल्या त्याच प्रकारच्या तेवढ्याच क्षेत्रफळाच्या जमिनीवर, त्याच गावात आकारण्याजोग्या आकारणीच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये ;

---

१ महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) जर संबंधित मालमत्ता ही, जिच्यावर लोक जाण्यायेण्याचा हक्क उपभोगीत आहेत किंवा त्यांनी असा हक्क संपादन केला आहे किंवा जिच्यावर कोणत्याही व्यक्तीचा वहिवाटीचा हक्क आहे अशी जमीन असेल तर, अशी नुकसानभरपाईची रक्कम, जमीन अधिनियमाअन्वये केलेल्या नियमांनुसार लागवडीखाली न आणलेल्या जमिनीवर गावात कर बसविण्याजोग्या वार्षिक आकाराच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये किंवा जर अशा नियमांत अशी आकारणी बसविण्याची तरतूद केलेली नसेल तर, अशी रक्कम जिल्हाधिकाऱ्याच्या मताप्रमाणे दावेदाराने धारण केलेला हक्क अगर हितसंबंध ह्याच्या बाजार किंमती इतकी असली पाहिजे ;

(तीन) जर जमिनीवर कोणतीही झाडे किंवा कोणतेही बांधकाम असेल तर, नुकसानभरपाईची रक्कम यथास्थिति, अशी झाडे किंवा असे बांधकाम यांच्या बाजार किंमती इतकी असली पाहिजे ;

१८९४ चा १. **स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "बाजार किंमत" याचा अर्थ, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ ची तरतूद, उक्त तरतूद जेथवर लागू करता येण्याजोगी असेल तेथवर, तीस अनुसरुन अंदाज केल्याप्रमाणेची किंमत, असा आहे.

१८९४ चा १. (२) पोट-कलम (१) अन्वये दिलेला प्रत्येक निवाडा हा, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २६ यात विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे, व उक्त अधिनियमाची तरतूद शक्य असेल तेथवर, असा निवाडा देण्यास लागू असली पाहिजेत.

१९५८ चा मुंबई ३१. **११.** उक्त अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, [१][मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७, अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुध्द अपील करता येईल. जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुध्द अपील.

**१२.** (१) [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] अर्जदार व राज्य शासन यांना नोटीस दिल्यानंतर अपिलाचा निर्णय दिला पाहिजे व त्या निर्णयाची दफ्तरात नोंद केली पाहिजे. महसूल न्यायाधिकरणासमोर काम चालविण्याची कार्यपध्दती.

१९०८ चा ५. (२) या अधिनियमान्वये असलेल्या अपिलांचा निर्णय देताना [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये मूळ न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करताना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय काम चालविण्यांची जी कार्यपध्दती अनुसरेल तीच कार्यपध्दती अनुसरली पाहिजे.

१९०८ चा ९. **१३.** या अधिनियमान्वये [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेले प्रत्येक अपील हे, जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्यांच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या मुदतीत दाखल केले पाहिजे. भारतीय मुदत अधिनियम, १९०८ याची कलमे ४, ५, १२ आणि १४ यांच्या तरतुदी अशी अपिले दाखल करण्यास लागू असतील. मुदत.

१८७० चा ७. **१४.** न्यायालय शुल्क अधिनियम, १८७०, यात काहीही अंतर्भूत असले तरी, ह्या अधिनियमान्वये [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेल्या प्रत्येक अपिलास विहित करण्यात येईल अशा किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेला असला पाहिजे. न्यायालय फी.

**१५.** [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] केलेल्या अपिलास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा व [१][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने] अपिलांत दिलेला निर्णय, निर्णायक व अंतिम असेल व त्यावर कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कामकाजात हरकत घेता येणार नाही. निवाड्याचे व महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयाचे निर्णायकत्व.

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

चौकशी व कामकाज हे न्यायसंबंधी कामे असणे.

**१६.** या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी व [1][महाराष्ट महसूल न्यायाधिकरणापुढे] असलेली सर्व चौकशी व कामकाज हे, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायसंबंधी कामे आहेत असे समजण्यांत येईल. १९६० चा ४५.

विवक्षित हक्क नष्ट केल्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत.

[2][१६-क. (१) कलम २ (१) (ड) (एक) मध्ये उल्लेख केलेल्या उत्पन्नातील हिश्श्यात कोणताही हक्क किंवा हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही इनामदाराने मुंबई जात इनाम रद्द करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९६१ अंमलात आल्यापासून बारा महिन्यांच्या मुदतीच्या आंत, त्याच्या हिश्श्याची रक्कम किंवा हिश्श्यातील त्याचा हक्क किंवा हितसंबंध, त्याच्या मागणी हक्काची कारणे आणि तो (हक्क किंवा हितसंबंध) नष्ट केल्याबद्दल त्याने मागणी केलेली नुकसानभरपाईची रक्कम नमूद करून, विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे. १९६१ चा ४३.

(२) जिल्हाधिकाऱ्याने जमीन महसूल अधिनियमात तरतूद केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर, नुकरसानभरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा दिला पाहिजे.

(३) उक्त निवाड्यावर महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल.

(४) कलम १० ते १६ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, अशा निवाड्याच्या किंवा यथास्थिति, अपिलाच्या संबंधातील कामकाजास लागू होतील.]

मालमत्तेतील इतर हक्क नाहीसे करणे वगैरेबद्दल नुकसानभरपाई देण्याची पध्दत.

**१७.** या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदीमुळे जर कोणत्याही व्यक्तीचे मालमत्तेतील तिचे कोणतेही हक्क किंवा हितसंबंध नष्ट होऊन किंवा त्यात फेरफार होऊन नुकसान झाले असेल व जर या अधिनियमाच्या तरतुदींत असे (हक्क किंवा हितसंबंध हे) रद्द किंवा नष्ट झाल्यामुळे किंवा त्यात फेरफार करण्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची तरतूद केलेली नसेल तर, अशा व्यक्तीस नुकसानभरपाईसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. १९६० चा ४५.

(२) पोट-कलम (१) अन्वये अर्ज, नेमलेल्या दिनांकापासून बारा महिन्यांचे आत जिल्हाधिकाऱ्याकडे केला पाहिजे. जिल्हाधिकाऱ्याने संहितेत विहित केलेल्या रीतीने रीतसर चौकशी केल्यानंतर भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यात विहित केलेल्या रीतीने व पध्दतीस अनुसरून नुकसानभरपाईची रक्कम विहित करणारा निवाडा दिला पाहिजे. १८९४ चा १.

(३) उक्त निवाड्याविरुध्द [1][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] अपील करता येईल.

(४) कलमे १० ते १६ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी शक्य असेल तेथवर, यथास्थिति असा निवाडा किंवा अपील यांच्या संबंधींच्या कामकाजास लागू असतील.

(५) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे जमीन महसूल भरण्याची पूर्णतः किंवा अंशतः माफी असलेले कोणतेही इनाम गाव किंवा इनाम जमीन उक्त संहितेच्या तरतुदीप्रमाणे पूर्ण आकारणी देण्यास या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अधीन करण्यात आली आहे या मुद्यावर नुकसानभरपाई मिळण्याचा कोणत्याही व्यक्तीस हक्क असणार नाही.

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय, आदेश १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६१ चा अधिनियम क्रमांक ४३, कलम ४ अन्वये कलम १६क समाविष्ट करण्यात आले.

[1][१७-क. या अधिनियमाच्या तरतुदींन्वये नुकसानभरपाई म्हणून देण्याजोगी रक्कम हस्तांतरित कर्जरोख्याच्या स्वरूपात देण्याजोगी असेल व असे कर्जरोखे काढल्याच्या दिनांकापासून त्यावर दरसाल दरशेकडा तीन टक्के या दराने व्याज मिळाले पाहिजे व त्या कर्जरोख्यांची रक्कम ते काढण्याच्या दिनांकापासून वीस वर्षांच्या मुदतीत मुद्दल व व्याज यांच्या वार्षिक समान हप्त्यांनी परतफेड करण्याजोगी असली पाहिजे. उक्त कर्जरोखे, विहित करण्यात येईल अशा दर्शनी किंमतीचे व अशा नमुन्यात असले पाहिजेत]. हस्तांतरित कर्ज-रोख्याच्या स्वरुपात नुकसान-भरपाईची रक्कम देण्याजोगी असणे.

१९४८ चा मुंबई ६७. १८. मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८, याच्या तरतुदींपैकी कोणतीही तरतूद ही, कोणत्याही इनाम गावास किंवा इनाम जमिनींच्या बाबतीत किंवा इनामदार व त्याची कुळे यांचे परस्पर हक्क व जबाबदाऱ्या यांच्या बाबतीत लागू होण्यास या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमुळे बाध येते असे समजता कामा नये; मात्र उक्त तरतुदी, या अधिनियमाच्या स्पष्ट तरतुदींशी कोणत्याही रीतीने विसंगत नसतील तेथवरच त्या अशा रीतीने लागू होण्यास बाध येणार नाही. सन १९४८ चा मुंबई अधिनियम ६७ च्या तरतुदी इनामदार व कुळ यांच्या संबंधास लागू असणे.

१९. राज्य शासनास या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्याच्या प्रयोजनासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम पूर्वप्रसिध्द करण्याच्या शर्तीस अधीन असतील व ते कायम करण्यात आल्यानंतर राजपत्रात प्रसिध्द केले पाहिजेत. नियम.

२०. (१) नेमलेल्या दिनांकापासून व दिनांकास,-- विवक्षित अधिनियमात फेरफार करणे व ते लागू असण्याचे बंद होणे.

(क) अनुसूची एक मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांच्या तरतुदींचा, उक्त अनुसूचीच्या ४ थ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत रद्द करण्यात किंवा सुधारण्यात येतील ; व

(ख) अनुसूची दोन मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमांच्या तरतुदी या सर्व इनाम गावांना किंवा जमिनींना व इनामदारांना लागू असणार नाहीत.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे पुढील गोष्टीस बाध येते असे समजता कामा नये :--

(क) नेमलेल्या दिनांकापूर्वी पत्करलेली कोणतीही जबाबदारी किंवा बंधन ;

(ख) अशा बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधीचे कोणतेही कामकाज; किंवा

(ग) उपरिनिर्दिष्ट दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी कोणत्याही न्यायालयात असे कामकाज चालू असताना केलेले कोणतेही कृत्य व असे कोणतेही कामकाज, जणू हा अधिनियम अंमलात आलेला नव्हता असे समजून चालू ठेवणे व निकालात काढणे.

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९, कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

# अनुसूची

(कलम २० पहा)

## अनुसूची-एक

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | रद्द किंवा सुधारल्याची व्याप्ति (४) |
|---|---|---|---|
| १८८७ | ७ | तोडा गिरास भत्ता अधिनियम, १८८७ | संपूर्ण अधिनियम रद्द करण्यात येईल. |
| १९४९ | ६१ | मुंबई मलेकी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९४९. | कलम ३ चे पोट-कलम (२) वगळण्यात येईल. |
| १९४९ | ६२ | मुंबई तालुकदारी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९४९. | कलम ५, पोट-कलम (२) खंड (अ) वगळण्यात येईल. |
| १९४९ | ६३ | पंचमहाल मेवासी सत्ताप्रकार नाहीसा करण्याबाबत अधिनियम, १९४९. | कलम ४, पोट-कलम (२) वगळण्यात येईल. |

## अनुसूची-दोन

| वर्ष (१) | क्रमांक (२) | संक्षिप्त नाव (३) | लागू असण्याचे बंद होण्याची व्याप्ति (४) |
|---|---|---|---|
| १८५२ | ११ | मुंबई खंड माफ भू-संपतीबाबत अधिनियम, १८५२. | संपूर्ण अधिनियम लागू असण्याचे बंद होईल. |
| १८६३ | २ | जमीन महसुलाच्या माफीबाबत अधिनियम (क्रमांक १), १८६३. | संपूर्ण अधिनियम लागू असण्याचे बंद होईल. |
| १८६३ | ७ | जमीन महसुलाच्या माफीबाबत अधिनियम (क्रमांक २), १८६३. | संपूर्ण अधिनियम लागू असण्याचे बंद होईल. |
| १८७१ | २३ | निवृत्तिवेतन अधिनियम, १८७१ ... | संपूर्ण अधिनियम लागू असण्याचे बंद होईल. |

एच ७१-(६,०८२ पु.)-१.२००७

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.